# <u>प्रेसनोट</u>

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०३.१२.२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | १) श्री.शशींकात मनोहरराव मेश्राम, वय—३५ वर्ष, (सरपंच यांचे पती) रा.कवठा बहाळे ता.भातकुली जि.अमरावती ह.मु.पावर्ती नगर क्र.२, संत गजानन कॉलनी, अमरावती<br>२) श्री.सुरेंद्र अजाबराव कुरवाडे, वय—४० वर्ष, पद—ग्रामसेवक, ग्रामपंचायत—कवठा बहाळे रा.नायरा पेट्रोल पंपाजवळ कठोरा नाका अमरावती<br>३) श्री.प्रल्हाद नामदेवराव तेलंग, वय—५३ वर्ष, पद—विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती भातकुली रा.जिजाउ कॉलनी,अर्जुन नगर अमरावती<br>४)श्री.चंदन बाबाराव नागमोते वय—३८ वर्ष, व्यवसाय—कंत्राटदार रा.पावर्ती नगर न.१,अमरावती. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दि.१९/११/२०२५ चे १७/०४ वा. ते १७/३१ वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलीली लाच रक्कम | ५०,०००/—रुपये |
| ५ | तडजोडीअंती लाच रक्कम | ४०,०००/— रूपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | निरंक |
| ७ | घटनास्थळ | पार्वती नगर,अमरावती येथील महात्मा फुले कॉलेज जवळ, अमरावती |

**थोडक्यात हकिकत**: यातील तक्रारदार यांनी दिनांक २७/१०/२०२५ रोजी तक्रार दिली की, तक्रारदार यांनी ग्राम कवठा बहाळे येथे ग्रामरोजगार सेवक म्हणून केलेल्या कामाचे मानधन एकुन १,६२,५००/— रु. च्या चेकवर सरपंच यांची सही आणून देण्यासाठी सरपंच सौ.किरण मेश्राम यांचे पती श्री.शशीकांत मेश्राम व ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे हे ५०,०००/—रु लाचेची मागणी करीत आहे.

त्यावरुन दि.२७/१०/२०२५ व दि.१९/११/२०२५ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांनी ग्राम कवठा बहाळे येथे ग्रामरोजगार सेवक म्हणून केलेल्या कामाचे मानधन एकुन १,६२,५००/— रु. चा सरपंच सौ.किरण मेश्राम यांची सही असलेला चेक आणून देण्यासाठी सरपंच सौ.किरण मेश्राम यांचे पती श्री.शशीकांत मेश्राम यांनी आपले पत्नीचा शासकीय तसेच ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे यांनी लोकसेवक पदाचा प्रभाव टाकुन तडजोडीअंती अनुक्रमे श्री.शशीकांत मेश्राम यांनी ४०,०००/—रु. लाचेची सरपंचाकरीता मागणी केली तसेच ग्रामसेवक कुरवाडे यांनी ३०,०००/—रु. लाचेची मागणी सरपंचासाठी करुन पैसे स्विकारण्यास सहमती दर्शविली. त्याचप्रमाणे लाच देण्यास प्रोत्साहन दिले तसेच विस्तार अधिकारी श्री.प्रल्हाद तेलंग व कॉन्ट्रक्टर श्री.चंदन नागमोते यांनी तक्रारदार यांना लाच देण्यास प्रोत्साहन दिल्याचे पडताळणी कार्यवाही दरम्यान निष्पन्न झाले. त्यानंतर दि.१९/११/२०२५ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान सरपंच यांचे पती श्री.शशीकांत मेश्राम व ग्रामसेवक श्री.सुरेंद्र कुरवाडे यांना तक्रारदार यांचेवर शंका आल्याने त्यांचेकडून लाच रक्कम स्विकारली नाही. त्यावरून वर नमुद आरोपी यांना ताब्यात

घेण्यात आले असून त्यांच्याविरूध्द पोलीस स्टेशन खोलापुरी गेट, अमरावती शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.बापु बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली, पर्यवेक्षण अधिकारी श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती, सापळा अधिकारी मपोनी. योगीता ठाकरे, पोउपअधिक्षक श्री.मंगेश मोहोड, पो.नि. चित्रा मेसरे, पो.नि.ज्ञानोबा फड,पो.नि.निलीमा सातव, पो.नि.सुजाता बन्सोड, पोहेकॉ प्रमोद रायपुरे, पोकॉ आशिष जांभोळे, वैभव जायले, उपेंद्र थोरात, शैलेश कडु, महेंद्र साखरे, युवराज राठोड, राजेश मेटकर तसेच चालक पोउपनि श्री.किटुकले, श्री.नाईक, श्री.शेंडे यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: १) मा.श्री.बापु बांगर, पोलीस अधीक्षक,लाचलुचपत, प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र अमरावती मो.क्र.९०११३२३४२६

२) श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र मो.क्र.९७६४२१०४८५

३) श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती मो.क्र.९८२३१११५५

ॲन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती, ऑफीस फोन नं. ०७२१—२५५२३५५, मो.न.७५१७५७१०६४, टोलफ्रि नंबर—१०६४

(योगीता ठाकरे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो,अमरावती सत्यमेव जयते